# DISTRICT AND SESSIONS COURT BEED
## LIST OF CANDIDATES WHO ARE ELIGIBLE FOR ORAL INTERVIEW FOR THE POST OF STENOGRAPHER

| Roll No. | Appication Id | Name |
|---|---|---|
| | | |
| S11 | DCR200656 | MANJUSHRI VIKRAM MANDVE |
| S09 | DCR162113 | OMKAR KISHOR JOSHI |
| S33 | DCR449875 | ANKUSH SADASHIV GANGANE |

Date:8-08-2018
Place : Beed

8/8/2018.
( Prachi P. Kulkarni )
Principal District Judge, Beed

## .उमेदवारांना सुचना

लघुलेखक नि. श्रे. पदाच्या सुचीबध्द करण्यांत आलेल्या वर नमुद उमेदवारांना मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यांत आले आहे. त्यांची मुलाखत दिनांक 13 ऑगस्ट 2018 रोजी घेण्यांत येईल.

मुलाखतीस येतांना उमेदवारांनी त्यांचे खाली दर्शविलेले सर्व मुळ शैक्षणीक प्रमाणपत्रे / कागदपत्रे / जात प्रमाणपत्र व त्यांच्या दोन साक्षांकित प्रती घेवून यावे. वर नमुद केलेल्या दिवशी दुपारी 03–00 ते 04–00 या वेळेत त्यांनी त्यांचे कागदपत्रे जिल्हा न्यायालयातील हॉल क्र. 311 मध्ये प्रबंधक / न्यायीक अधिकारी यांचेकडे पडताळणीसाठी सुपूर्द करावेत. सदर कागदपत्र वरील नमुद वेळेतच दाखल करावीत, पुन्हा संधी मिळणार नाही. कागदपत्रात त्रुटी असल्यास मुलाखतीसाठी अपात्र ठरविण्यांत येईल. कागदपत्र तपासणी / पडताळणी नंतर लगेचच प्रत्यक्ष मुलाखतीला सुरुवात होईल. उमेदवारांनी दिलेल्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर न चुकता हजर रहावे.

त्याचप्रमाणे मुळ कागदपत्रामध्ये नांवात बदल अथवा कोणतेही बदल असल्यास उमेदवारास मुलाखतीची संधी दिली जाणार नाही. करीता कागदपत्रे योग्य त्या सक्षम अधिका–याकडून प्राधिकृत केलेली असावी. सर्व कागदपत्रे त्यांच्या नोंदणी अर्जात भरलेल्या नांवाप्रमाणे असतील याची खबरदारी घ्यावी.

**उमेदवारांनी अर्ज भरतांना दिलेल्या माहितीप्रमाणे प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती आणि त्यांचे मुळ प्रमाणपत्रे मुलाखती वेळी येतांना सोबत आणणे अनिवार्य राहील.**

(1) मुळ प्रवेशपत्र (हॉलतिकीट)

(2) ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदान कार्ड / पारपत्र / वाहन चालविण्यांचा परवाना / उमेदवाराचे मालकाने अथवा शैक्षणिक संस्थेने प्रदान केलेले मुळ ओळखपत्र यापैकी एक मुळ पुरावा ( कलर झेरॉक्स किंवा झेरॉक्स विचारात घेण्यांत येणार नाही ).

(3) जन्म तारखेचा दाखला किंवा पुरावा ( शाळा सोडल्याचा / जन्माचा / S.S.C. दाखला )

(4) अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्या बाबतचा दाखला

(5) अर्हता परीक्षेत / पदवी परीक्षेत मिळालेल्या गुणांचे विवरणपत्र

(6) दोन सन्माननीय व्यक्ती, ज्यांची नांवे मुळ अर्जात नमुद केलेली आहेत, त्यांनी दिलेला, उमेदवाराचे चारित्र्य चांगले असल्याबददलचा चारित्र्याचा दाखला.

(7) अर्हतेच्या रकान्यात नमुद केल्याप्रमाणे , संगणक प्रचालनाचे विहीत ज्ञान असल्या बाबतचा विद्यापीठ / संस्थेने दिलेला दाखला.

(8) इंग्रजी आणि लघुलेखन व टंकलेखनातील आवश्यक वेग असल्या बाबतचा शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र शासन किंवा शासकीय मंडळ किंवा I.T.I. यांनी दिलेला दाखला.

(9) संबंधीत जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शल्य चिकीत्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला ( लागू असल्यास )

(10) शासन विहीत करील त्या प्राधिका–याने दिलेला जातीचा दाखला. ( जेथे लागू असेल तेथे )

(11) छोटया लहान कुटूंबा बाबतचे प्रतिज्ञापत्र ( जाहीरातीचे शेवटी दिलेल्या नमुना "अ" मध्ये )

(12) विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र ( जर उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर )

दिनांकः– 08–08–2018
जिल्हा न्यायालय, बीड

(प्राची पी. कुलकर्णी)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
बीड